# QUESTION BANK

## विषय: आधुनिक व्यवस्थापन पद्धती

## 2020-21 सत्र: ६

सूचना:

1) खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे कंसात दिली आहेत.
2) येथे दिलेल्या प्रश्नांमधीलच प्रश्न परीक्षेमध्ये विचारले जातील असे नाही. या व्यतिरिक्त वेगळे परंतु अभ्यासक्रमातीलच प्रश्नसुद्धा विचारले जाऊ शकतात याची सर्वांनी नोंद घ्यावी. त्यामुळे सर्वांनी syllabus (सिल्याबसनुसार) वाचन करणे आवश्यक आहे.

## प्रकरण पहिले आणि दुसरे

1. ............. म्हणजे वस्तूंच्या अंगी असणारा गुणात्मक व संख्यात्मक घटकांचा समूह होय. (गुणवत्ता)
2. देखणेपणा, रंग, गंध, उपयोगिता हे वस्तुमधील ............घटक आहेत. (गुणात्मक)
3. डिझाईन, लांबी, रुंदी, ऊंची, वजन, आकार हे वस्तुमधील ............घटक आहेत. (संख्यात्मक)
4. वस्तू/सावेमधील........... म्हणजे वस्तु अथवा सेवेची एकुणात असणारी लक्षणे व वैशिष्ट्ये की ज्याद्वारे ग्राहकाच्या पूर्वघोषित किंवा गृहीत गरजांचे समाधान होते. (गुणवत्ता)
5. ........... ग्राहकाच्या गरजांचे समाधान करणारा गुणघटक आहे. (गुणवत्ता)
6. ............म्हणजे वस्तूच्या उत्तमतेचे प्रमाण/मापदंड होय. (गुणवत्ता)
7. संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन या संकल्पनेचा वापर सर्वप्रथम १९८५ साली .........मध्ये केला गेला. (अमेरिकन नौदल)
8. ............ हा गुणवत्तेचा आधार असतो. (ग्राहकाच्या गरजांची पूर्तता)

9. ............ हे एक तत्वज्ञान आहे की ज्यानुसार संघटनेतील प्रत्येक घटक दर्जा/गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि ग्राहकांच्या समाधानासाठी सतत प्रयत्नशील असतो. (संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन)

10. संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापनामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचा .......... अपेक्षित असतो. (सक्रिय सहभाग)

11. ......... = ग्राहक समाधान + सर्वांचा सहभाग + सतत सुधारणा (संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन)

12. PDCA चक्र -Plan, do, Check, Act (नियोजन, कार्य करणे, तपासणी, कृती) हे ..........म्हणून ओळखले जाते. (डेमिंग व्हील/चक्र)

13. संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापनामध्ये ..........ची बांधिलकी महत्वाची असते. (उच्च व्यवस्थापन)

14. संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापनामुळे............. मध्ये लक्षणीय वाढ होते. (उत्पादकता)

15. .......... कामगिरीच्या तुलनात्मक मूल्यमापनाची पद्धती आहे. (बेंचमार्किंग)

**सूचना:**

**येथे दिलेल्या प्रश्नांमधीलच प्रश्न परीक्षेमध्ये विचारले जातील असे नाही. या व्यतिरिक्त वेगळे परंतु अभ्यासक्रमातीलच प्रश्नसुद्धा विचारले जाऊ शकतात याची सर्वांनी नोंद घ्यावी. त्यामुळे सर्वांनी syllabus सिल्याबसनुसार वाचन करणे आवश्यक आहे.**

16. आपल्या व्यवसायाची तुलना सर्वोत्कृष्ठ व आदर्श व्यवहार/ प्रक्रिया असना-या व्यवसायाबरोबर करणे, त्यांची माहिती मिळविणे, मापदंड ठरविणे व आपला उद्योग त्या पातळीवर नेण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजे........... होय. (बेंचमार्किंग)

17. ...........यांनी १९८० साली बेंचमार्किंग ही संकल्पना मांडली. (रौबर्ट केम्प)

18. सिक्स सिग्मा (Six Sigma) ही संकल्पना सर्वप्रथम ...........यांनी १९८५ साली मांडली. (बिल स्मिथ)

19. ............ ही उत्पादन प्रक्रियेतील दोष मोजण्याची सांख्यिकीय पद्धती आहे. ( सिक्स सिग्मा)

20. सिक्स सिग्मामध्ये.............पातळ्या आहेत. (सहा)

21. सिक्स सिग्मामध्ये दोष संख्या एका पातळीवरून दुसऱ्या पातळीवर येणे म्हणजे दोष संख्या ........... होय. (कमी होणे)

22. दोष सुधारून प्रक्रिया निर्दोष बनविणे, ग्राहकांच्या गरजा पूर्ण करणे हा ............. चा मुख्य उद्देश आहे. (सिक्स सिग्मा)

23. सिक्स सिग्मामध्ये निर्दोषता प्रमाण पहिल्या पातळीवर ......... तर सहाव्या पातळीवर ...........असते. (३०.८५४%, ९९.९९७%)

24. सिक्स सिग्मा पातळी गाठणे म्हणजे दशलक्ष संधीमागे......... दोष असणे होय. (3.4)

25. आंतरराष्ट्रीय मानक संघटना (International Organization for Standardization) ची स्थापना ........ साली झालेली असून मुख्य कार्यालय .........येथे आहे. (1947, जिनिव्हा)

26. .................. हे गुणवत्ता निर्माण करण्यासाठी बनविलेले प्रमाप आहे कि जे गुणवत्ता वाढविण्यासाठी संघटनेच्या व्यवस्थापन पद्धतीला विशेष टप्पे पुरविते. (आय एस ओ ९०००)

27. ................. मध्ये आय एस ओ ९००० मालिकेला सुरुवात झाली. (1987)

28. ...........मुळे वस्तूला/संस्थेला आंतरराष्ट्रीय मान्यता व ग्राहकांना गुणवत्तेची हमी मिळते. (आय एस ओ ९०००)

**सूचना:**

**येथे दिलेल्या प्रश्नांमधीलच प्रश्न परीक्षेमध्ये विचारले जातील असे नाही. या व्यतिरिक्त वेगळे परंतु अभ्यासक्रमातीलच प्रश्नसुद्धा विचारले जाऊ शकतात**

**याची सर्वांनी नोंद घ्यावी. त्यामुळे सर्वांनी syllabus सिल्याबसनुसार वाचन करणे आवश्यक आहे.**

29. **जपानी व्यवस्थापनामधील ५ एस पद्धतीमध्ये सियरी, सीयटन, सियसो, सीयकेतसू आणि .............चा समावेश होतो. (शित्सुके)**
30. **जपानी व्यवस्थापनामध्ये सियरी (Seiri) म्हणजे...........होय. (वर्गीकरण) सीयकेतसू**
31. **जपानी व्यवस्थापनामध्ये सीयटन (Seiton) म्हणजे...........होय. (पद्धतशीर मांडणी)**
32. **जपानी व्यवस्थापनामध्ये सियसो (Seiso) म्हणजे...........होय. (स्वच्छता)**
33. **जपानी व्यवस्थापनामध्ये सीयकेतसू (Seiketsu) म्हणजे...........होय. (प्रमाणीकरण)**
34. **जपानी व्यवस्थापनामध्ये शित्सुके (Shitsuke) म्हणजे...........होय. (राखणे/ठेवणे)**
35. **..................उत्पादन स्थळावरील आवश्यक आणि अनावश्यक गोष्टी कोणत्या आहेत त्यांचे वर्गीकरण करणे होय. (सियरी)**
36. **............. म्हणजे कार्यस्थळावरील साहित्य, उपकरणे, हत्यारे इ. ची योग्य जागी, व्यवस्थित मांडणी करणे की जेणेकरून सहजतेने उपलब्ध व कमीत कमी हालचाली कराव्या लागतील. (सीयटन)**
37. **........... म्हणजे विविध कामांसाठी प्रमाणित पद्धती ठरविणे/कामासाठी सर्वोत्तम प्रमाणित पद्धती विकसित करणे. (सीयकेतसू)**
38. **............ म्हणजे इतर चार पद्धतींच्याबाबातीत (सियरी, सीयटन, सियसो, सीयकेतसू) कायमस्वरूपी स्वयंशिस्त व वचनबद्धता स्वेच्छेने स्वीकारणे व ती राखण्यासाठी कठोर राहणे होय. (शित्सुके)**
39. **.............या संकल्पनेनुसार अति मालसाठा केला तर कंपनीच्या साधनांचा अपव्यय होतो. (जस्ट इन टाईम -Just In Time )**

40. जपानी लोकांची ........... आणि राष्ट्रीय चारित्र्याचे प्रतिबिंब जपानी व्यवस्थापनामध्ये दिसते. (देशभक्ती)
41. जपानी व्यवस्थापनामध्ये जबाबदारीचे स्वरूप हे............असते. (सामुहिक)
42. जपानी व्यवस्थापनामध्ये जीवनभर............. हे वैशिष्ट्य प्रामुख्याने पहावयास मिळते. (रोजगार)
43. जपानी कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांना..............नुसार मोबदला मिळतो. (सेवाजेष्ठाते)
44. कर्मचाऱ्याला सतत एकाच प्रकारचे काम न देता कालांतराने त्यामध्ये बदल करणे म्हणजे...............होय. (अविशेषीकृत करीअर/सेवा मार्ग)
45. जपानी व्यवस्थापनामध्ये निर्णय घेण्यासाठी खास अशी ............पद्धती वापरली जाते, (रिंगी)
46. रिंगी पद्धतीमध्ये अपेक्षित निर्णयाच्या शिफारशीचा जो प्रस्ताव तयार करून वरिष्ठ अधिकाऱ्याला पाठविला जातो त्याला..............म्हणतात. (रिन्गीशो दस्तऐवज)
47. ............म्हणजे तरुण कर्मचाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन सामुहिक कृती करण्याची पद्धती होय. (ओमीकोशी व्यवस्थापन)
48. जपानी व्यवस्थापनामध्ये एकाच क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणाऱ्या व्यक्तींचा गट जो स्वेच्छेने एकत्र येतो त्याला...........म्हणतात. (गुणवत्ता मंडळ-Quality Cirlcle)
49. .......... या संकल्पनेचा अर्थ सातत्याने सुधारणा करणे असा होतो.(कायझेन)
50. छोट्या-छोट्या सुधारणा स्वीकारून मोठे यश प्राप्त करणे हे ..........चे तत्वज्ञान आहे. (कायझेन)
51. उत्पादन कार्यस्थळावर अपव्यय/खराबी/नुकसान यांचे उच्चाटन म्हणजे.............. होय. (मुदा कपात/ मुदा उच्चाटन)
52. जपानी व्यवस्थापनामध्ये मुरा -Mura म्हणजे ......... तर मुरी- Muri म्हणजे .........होय. (असमानतेचे काम, ताणताणाव/त्रास )

53. **जपानी व्यवस्थापन तंत्रांमध्ये थ्री एम्स (three Ms) किंवा तीन राक्षस आहेत ते म्हणजे मुदा, मुरा आणि .......... होय. (मुरी)**

54. **........... हे जपानी व्यवस्थापन तंत्रांमधील एक तंत्र आहे की ज्यानुसार उत्पादन प्रक्रियेमध्ये घडणाऱ्या मानवी चुकांचे वेळीच उच्चाटन केले जाते. (पोका-योके - Poka-Yoke)**

55. **जपानी व्यवस्थापन तंत्रांमधील ........... हे तंत्र कोणतीही समस्या सोडविताना घाई न करता कार्य करण्यापूर्वी विचार करण्यास प्रोत्साहित करते. (काटा- Kata)**

56. **जपानी व्यवस्थापन तंत्रांमधील...............म्हणजे कोणतेही कार्य करण्याचा मार्ग/क्रम. (काटा)**

57. **जपानी व्यवस्थापन तंत्रांमधील............. म्हणजे वास्तविक ठिकाण/जागा किंवा ज्या ठिकाणी प्रत्यक्ष प्रक्रिया/कार्य चालते ती जागा. (गेम्बा Gemba)**

58. **जपानी व्यवस्थापन तंत्रांमधील गेम्बा Gemba या तंत्रानुसार ................ वास्तविक ठिकाण/प्रत्यक्ष कामाच्या जागेवर जास्तीत जास्त वेळ दिला पाहिजे. (सुपरव्हायजरनी/अधिकाऱ्यांनी)**

59. **जपानी व्यवस्थापन तंत्रांमधील .............. म्हणजे जा आणि स्वतःपहा किंवा समस्या प्रभावीपणे समजण्यासाठी व सोडविण्यासाठी तेथे प्रत्यक्ष जाऊन पाहणी करणे. (गेंची गेन्बुस्तु Genchi Genbustu)**

60. **......... संघटनांमध्ये संघटनांच्या सदस्यांना कुटुंबाचा भाग म्हणून पाहणायचा प्रयत्न असतो. (चीनी)**

61. **चायनीज व्यवस्थापनाची सुधारणा, गतिमानता, लवचिकता आणि ........... ही चार तत्वे आहेत. (प्रतिसाद)**

62. **..............व्यवस्थापन हे मनुष्य /कुटुंब केंद्रित असते. (चायनीज)**

63. **........... हे व्यवस्थापनावर मजबूत सत्ता वापरून व्यवसाय नियंत्रित करण्याविषयीचे चायनीज व्यवस्थापनाचे वैशिष्ट्य आहे. (सत्तेचे केंद्रीकरण)**

64. **चायनीज व्यवस्थापनामध्ये मुख्य धोरणात्मक निर्णय हे सहसा ............मार्फत घेतले जातात. (कुटुंबातील सदस्य)**

65. **चीनी संघटनांचा आकार ..........असतो. (लहान)**

66. **चायनीज व्यवस्थापनामधील .......... याचा अर्थ नातेसंबंध असा होतो. (गुंक्सी Guanxi)**

67. **चायनीज व्यवस्थापनामधील........... हे नाते शिकण्यापासून परस्पर मित्रास ओळखण्यापर्यंतचे एक मांध्यम आहे. (गुंक्सी Guanxi)**

68. **............ दीर्घकालीन स्थिरता आणि कामगिरी यावर भर देते. (चायनीज व्यवस्थापन)**

69. **परिवर्तनवादी, व्यवहारी, पितृत्वाचे, सत्तावादी ही ......... ची वैशिष्ट्ये आहेत. (चायनीज नेतृत्व)**

70. **चायनीज व्यवस्थापनामध्ये व्यवसाय व वैयक्तिक नातेसंबंध यामध्ये फरक केला ........... (जात नाही)**

71. **............. व्यवस्थापनामध्ये मानवी संबंध व आंतरसंबंध यावर भर नसतो. (पाश्चिमात्य)**

72. **............मध्ये संदेशवहन हे निष्क्रिय असते. (चायनीज व्यवस्थापना) तर ..........मध्ये संदेशवहन हे थेट व स्पष्ट असते (पाश्चिमात्य व्यवस्थापना)**

73. **............... व्यवसाय हा केंद्रविंदू असतो. (पाश्चिमात्य व्यवस्थापनामध्ये)**

74. **............वक्तशीरपणा व वेळेला खूप महत्व महत्व दिले जाते. (चायनीज व्यवस्थापनामध्ये)**

**[सूचना: दिलेल्या प्रश्नांमधीलच प्रश्न परीक्षेमध्ये विचारले जातील असे नाही. या व्यतिरिक्त वेगळे परंतु अभ्यासक्रमातीलच प्रश्नसुद्धा विचारले जाऊ शकतात याची सर्वांनी नोंद घ्यावी. त्यामुळे सर्वांनी syllabus सिल्याबसनुसार वाचन करणे आवश्यक आहे.]**

# ALL THE BEST